Level5_Pachavi_Reading Passage

आमच्या ताईला गुलाबाचा सुगंध भारी प्रिय. मागच्या सुट्टीत तर तिने कमालच केली! गुलाब या विषयावर संशोधन करून एक लेखही लिहून टाकला. मग काय, आमची पूर्ण सुट्टी गुलाबी झाली!

ताईने भाषण दिले,"बंड्या, तुला माहित आहे का? गुलाबाच्या १०० हून जास्त जाती आहेत! फुलांचा आकार दोन इंचापासून ते तीस इंचापर्यंत असू शकतो. गुलाबाच्या पाकळया मुलायम पण झुडुप मात्र काटेरी असते. गुलाबाचे अनेक रंग व मिश्र जाती असतात. लाल गुलाब प्रेमाचे प्रतीक आहे, तर पिवळा गुलाब मैत्रीचे, गुलाबी गुलाब आनंदाचे, नारिंगी गुलाब उत्साहाचे, व पांढरा गुलाब पवित्रतेचे प्रतीक आहे."

मग मीपण जाहीर केले," माहितेयना! गुलाबापासून बनवलेले अत्तर प्रसिध्द आहे. आपल्या घरात तर सध्या घमघमाट असतो! शिवाय गुलाबापासून बनवलेला गुलकंद पौष्टिक असतो."

त्यावर ताई उद्गारली, "अरे, बंड्या! गुलाबाचे झुडूप अनेक वर्ष जगू शकते. जर्मनीमधल्या एका चर्चच्या भिंतीवर वाढलेले गुलाबाचे झाड १००० वर्ष जगले आहे!

मग मीपण म्हणालो, "भारतात गुलाब हे मुलीचे नाव असते, तसचं अमेरीकेत रोझ हेपण मुलीचे नाव असते." ताईने माझ्याकडे डोळे वटारून बघितले!

1. ताईला कसला नाद लागला होता?
2. गुलाबापासून काय बनवतात?
3. गुलाबाच्या रंगांचे महत्त्व काय आहे?
4. <u>"मग काय, आमची पूर्ण सुट्टी गुलाबी झाली!"</u> असे का म्हंटले आहे?
5. <u>ताईने माझ्याकडे डोळे वटारून बघितले!</u> म्हणजे काय?

Level5_Pachavi_Reading Passage

जगातील सर्वात उंच पर्वत नेपाळमधे आहे - माउंट एव्हरेस्ट.

माउंट एव्हरेस्टला नेपाळी भाषेत 'सागरमाथा' म्हणतात. त्याची समुद्रसपाटीपासून उंची आहे - २९,०२९ फूट. एव्हरेस्ट वर चढण्याकरता गिर्यारोहक उन्हाळयात नेपाळमधे येतात. एव्हरेस्टवर चढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग आग्नेय दिशेने नेपाळमधून आहे. हा मार्ग सर्वमान्य आहे. दुसरा मार्ग उत्तरेला तिबेटमधून आहे. एव्हरेस्टवर चढताना ऑक्सिजनचा दाब कमी असल्याने, गिर्यारोहकांना श्वास घ्यायला त्रास होतो. म्हणून ते ऑक्सिजन सिलेंडर बरोबर नेतात. शिवाय जोराचा वारा, हिमवृष्टी व हिमलोट ह्यांनापण गिर्यारोहकांना सामोरे जावे लागते.

न्यूझीलंडचे एडमंड हिलरी आणि नेपाळी शेर्पा तेनसिंग नोर्गे, ही जोडी पहिल्यांदा २९ मे, १९५३ ला सकाळी ११.३० वाजता एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचली. पहिली महिला, जपानी जुन्को ताबेई, १६ मे, १९७५ रोजी एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचली. रिन्होल्ड मेस्सनेर हा पहिला गिर्यारोहक होता, ज्याने ऑक्सिजन सिलेंडर न वापरता एव्हरेस्टचे शिखर गाठले. आता पुष्कळ गिर्यारोहक ऑक्सिजन सिलेंडर न वापरता एव्हरेस्ट चढतात.

1. जगातील सर्वात उंच पर्वत कुठे आहे व त्याचे नाव काय आहे?
2. उंच पर्वतांवर चढताना काय अडचणी येतात?
3. एव्हरेस्टवर चढण्याचे किती मार्ग आहेत व ते कुठे आहेत?
4. एव्हरेस्टच्या शिखरावर पहिल्यांदा कोण व कधी पोहोचलं?
5. वरील उताऱ्याची मुख्य संकल्पना / main idea काय आहे?

# BMM BV EXAM 2017 Comprehension Passages

Level5_Pachavi_Listening Passage

शेतीचा शोध

खूप प्राचीन काळी शेतीचा शोध लागण्यापूर्वी माणूस भटके जीवन जगत होता. त्या काळी, जगण्यासाठी तो प्राण्यांची शिकार आणि कंदमुळे यांच्यावर अवलंबून होता. पुढे माणूस शेती करू लागला.

शेती करण्यासाठी पाण्याची गरज असल्याने तो पाण्याजवळ वस्ती करून राहू लागला. त्या ठिकाणी अनेक माणसे घरे बांधून राहू लागली. एकमेकांच्या सहकार्याने शेती करू लागली. त्यातून गावे निर्माण झाली.

शेतीच्या शोधानंतर माणसांची कामे वाढली. शेतीसाठी अवजारे तयार करणे, त्यांची दुरूस्ती करणे, कापड विणणे, मातीची भांडी तयार करणे असे विविध व्यवसाय करणारे कारागीर तयार झाले. शेतीसाठी माणसे बैल पाळू लागली. मालाची वाहतूक करण्यासाठी बैलगाड्यांचा वापर व्हायला लागला. गायी, म्हशी पाळल्यामुळे दूध मिळायला लागले, कुत्रे पाळल्यामुळे घराची, शेताची राखण व्हायला लागली. इकडून तिकडे जाण्यासाठी घोड्यांचा वापर होऊ लागला.

1. शेती करण्याआधी माणूस कशावर जगत असे?
2. गावे कशी निर्माण झाली?
3. शेतीच्या शोधामुळे माणसाचा जीवनपद्धतीत कोणता बदल झाला ?
4.प्राचीन शब्दाचा अर्थ काय आहे? वाक्यात उपयोग करा.
5. तुम्ही एकमेकांच्या सहकार्याने कोणते काम केले आहे?

# BMM BV EXAM 2017 Comprehension Passages

Level5_Pachavi_Listening Passage

**त्सुनामी** म्हणजे समुद्रातील पाणी वेगाने आणि मोठ्या प्रमाणात किनाऱ्यावर आदळताना तयार होणारी लाटांची मालिका होय. भूकंप किंवा ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यामुळे त्सुनामी निर्माण होऊ शकतात.

त्सुनामी हा जपानी शब्द असून त्याचा अर्थ "बंदरातील लाटा" असा आहे. हा शब्द कोळयांत प्रचलित होता. मासेमारी करून परत आलेल्या कोळयांना संपूर्ण बंदर नाश पावलेले दिसे, पण समुद्रात लाटा दिसत नसत; त्यामुळे हे नाव देण्यात आले.

किनाऱ्यापासून दूर समुद्रात या लाटांची उंची जास्त नसते पण लांबी जास्त असते. त्यामुळे त्या दिसून येत नाहीत. परंतु जेव्हा या लाटा किनाऱ्याजवळ येतात त्यावेळी मात्र त्यांची उंची वाढते व लांबी कमी होते, या बलाढ्य लाटा आदळल्याने किनारपट्टीचे नुकसान होते. मॅनग्रोव्हची वने व प्रवाळ बेटे (coral islands) नैसर्गिकरीत्या त्सुनामीच्या तडाख्यापासून संरक्षण करतात.

पहिली त्सुनामीची नोंद ग्रीसमध्ये इ.स.पू. ४२६ साली झाली. इ.स. २००४ मध्ये आग्नेय् आशियात, हिंदी महासागरात त्सुनामी आली होती. डिसेंबर २६, २००४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास सुमात्रा बेटाजवळील समुद्रामध्ये तीव्र भूकंप झाला. त्यातून उद्भवलेल्या लाटांमुळे त्सुनामी निर्माण झाली. या त्सुनामीने इंडोनेशिया, थायलंड, भारत, बर्मा, मादागास्कर, श्रीलंका या देशांना फटका बसला. ही नैसर्गिक आपत्ती इतिहासात सर्वांत भयानक व नुकसानकारक ठरली. त्यात अंदाजे २,२७,९८८ लोकांचा बळी गेला.

1. त्सुनामी हे नाव कसे पडले?
2. त्सुनामी म्हणजे काय?
3. त्सुनामी निर्माण कशी होते?
4. २००४ साली झालेल्या त्सुनामीचे वर्णन करा.
5. मॅनग्रोव्हची वने व प्रवाळ बेटे (coral islands) त्सुनामीच्या तडाख्यांपासून किनारपट्टीचे संरक्षण कशी करत असावीत?